नांदेड जिल्हयातील राजकीय,आर्थिक व सामाजिक चळवळीतील स्त्रियांचा एक ऐतिहासिक आभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

समाजिकशास्त्र विद्या शाखेतील इतिहास विषयातील पीएच.डी.
पदवीसाठी साधर करण्यात येणारा संशोधन आरखडा

संशोधक

निर्मला दत्तात्रय रत्नपारखे

सोमेश कॉलनी कलामंदिरच्या पाठीमागे

नांदेड . ४३१६०१

मार्गदर्शक

डॉ. केंद्रे किशन चुडामन

लोकमान्य महाविद्यालय सोनखेड ता. लोहा जि. नांदेड

मार्च २०१६

नांदेड जिल्हयातील राजकीय,आर्थिक व सामाजिक चळवळीतील स्त्रियांचा ऐतिहासिक आभ्यास

प्रस्तावनाः-

प्राचीन काळापासुन ते आजपर्यंत भारतीय स्त्रिला एक दुर्लक्ष स्त्रोत घटक म्हणुन पाहिले जाते. भारतीय स्त्री स्त्रियाचा प्रश्नाचा, कर्तृत्वाचा, दुखाचा त्यामागील कारणाचा आभ्यास तसेच हुंडाबळी, बलत्कार, स्त्री, भृणहत्या, बालविवाह, घटस्फोट, सक्तीचे वैधव्य स्त्रीचे शिक्षण व आरोग्य याकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती स्त्री स्वातंत्र्यावरील निर्बंध हे आज स्त्रियांचा पुढील प्रश्न आहेत.

स्त्री-सुधारणा चळवळीमुळे स्त्री चळवळीचा १९२० ते १९४७ हा काळ निर्णायक होता. महात्मा गांधीच्या प्रभावामुळे या काळात सर्वच थरातील भारतीय स्त्री मोठया प्रमाणात स्वातंत्र्यसंग्रामात सक्रिय झाली होती.

भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीने स्त्री-पुरूष समानतेची मागणी केली. १९७५ नंतर स्त्री घटना गतीमान झाल्या या काळात 'राष्ट्रीय महिला समिती' स्थापन झाली. स्त्रिया विषयक योजनांची अंमलबजावनी पाहणे हे त्या समितीचे कार्य होते. अशा चळवळीमुळे स्त्रीला स्वत:हाचे व स्वत:हाच्या प्रश्नांचे आत्मभान येत गेले. स्त्री-संघटनांची जाणीव झाली आणि त्यातून विसाव्या शतकात स्त्रीवादी विचारसरणी उदयास आली.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय स्त्री निरनिराळया क्षेत्रात वावरताना दिसु लागली. निरनिराळया क्षेत्रात शिक्षण घेवुन नोकरी व्यवसायातुन स्थिरावलेल्या अनेक महिला आहेत. मराठवाडयातल्याही स्त्रीया शिकायला लागल्या आहेत.

आज एकविसाव्या शतकात भारतीय शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी सर्वच ठिकाणी प्रयत्न केले जात आहेत. विज्ञान तंत्रज्ञान सारख्या उच्चक्षेत्रात प्रगती केलेली दिसुन येते. जग हे खुप पुढे गेले आहे असे म्हणताना आज महासत्ता बनु पाहणा-या भारतासमोर स्त्री भ्रुण हत्या, लैंगिक अत्याचार, बलत्कार याविषयी चर्चा व परिसंवाद घडत आहेत. ही बाब निश्चितच खेदाची आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्त्रियांच्या असणा-या कनिष्ठ दर्जात परिवर्तनासाठी अनेक पातळयांवर प्रयत्न झाले. समाजसुधारकांनी प्राप्तीनंतर स्त्री-पुरूष विषमता नष्ट करून दोघांनाही समान हक्क व समान दर्जा मिळावा यासाठी घटनात्मक तरतुद करण्यात आली. ही पहिली पुण्यात शाळा काढल्यामुळे स्त्रीयांना शिक्षणाचीद्वारे खुले झाली.

स्त्रीयांच्या प्रत्यक्ष सहभागामुळे अनेक संस्था, संघटना निर्माण झाल्या प्रामुख्याने आर्य महिला समाज, शारदा सदन, हिंदु सेविका संघ, सेवा सदन इत्यादी स्त्री मुक्तीच्या कांतीकारक चळवळीतील कार्य महत्वाचे काम मा.फुले आणि सावित्रीबाई फुले या दाम्पंताने केले. त्यांनी प्रबोधन युंगाची गंगा बहुजन समाजापर्यंत पोहचवली. पण आज एकविसाव्या शतकामध्ये विज्ञानाची चाहुल प्रत्येकाच्या घरापर्यंत पोहचली आणि वेळ बदलली परिस्थिती बदलली आणि जिजाउ सावित्रीच्या लेकिन आता आकाशात भरारी घेतली.

ताराबाई शिंदे यांनी स्त्री-पुरुष तुलना पुस्तकातुन समानतेचा आवाज उढविला. नांदेड जिल्यातील स्त्री मुक्ती चळवळीचा सुरुवात झाली संघटित पध्दतीने स्त्री जागृती केल्या शिवाय स्त्रियांच्या वाटयाला येणारे अत्याचार, अन्याय छळ, शोषण, स्त्रियांना दिली जाणारी विषमता यांचा आभ्यास करण्यात येणार आहे.

महाराष्ट राज्यात ३५ जिल्हे आहेत. त्यातील नादेड हे शहर गोदावरी नदीच्या काठी वसलेले असून क्षेत्रफळ १०,५२८ चौ.कि.मी. आहे. तालुके १६ आहेत.

आभ्यासाचे महत्व

नांदेड जिल्हातील राजकीय, आर्थिक व सामाजीक चळवळीतील स्त्रियांच्या कार्याचा व त्यांच्या साहित्य सामुग्रीचा आभ्यास करुन समाजामध्ये जनजागृती निर्माण करणे, तसेच नांदेड जिल्हातील राजकीय, आर्थिक व सामाजिक स्त्रीयांच्या विषयावर प्रकाश पडण्यासाठी या संशोधनाचे आणि आभ्यासाचे महत्व आहे.

संशोधनाची आवश्यकता

नांदेड जिल्हा हा मराठवाडयातील प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर जिल्हा आहे. त्याच प्रमाणे येथील स्त्रिया सुध्दा वेगवेगळया क्षेत्रामध्ये महत्वाची भुमिका बजावत आहेत.जसे राजकीय, आर्थिक व सामाजिक इत्यादी उल्लेखनीय कार्य करीत आहेत. नांदेड जिल्हातील राजकीय, आर्थिक व सामाजिक चळवळीतील ही समाजातील स्त्रियांनी एकत्रित येवुन समाजातील प्रश्न हुंडाबळी, महिलावर होणारे अत्याचार, स्त्रीभ्रण हत्या हे समाजापुढील गंभीर स्वरुपाचे प्रश्न आहेत. महत्वाचा अभ्यास म्हणुन त्यामुळे या विषयावर संशोधन करण्याची आवश्यकता आहे.

उददेश

१. राजकीय, आर्थिक व सामाजिक चळवळीच्या व्याख्या देणे.
२. राजकीय, आर्थिक व सामाजिक चळवळीचे उद्देश स्पष्ट करणे.
३. राजकीय, आर्थिक व सामाजिक चळवळीच स्वरुप स्पष्ट करणे.
४. नांदेड जिल्हयाचा भौगोलिक व ऐतिहासिक आढावा घेणे.
५. राजकीय, आर्थिक व सामाजिक चळवळीतील महिला नेतृत्वाचा आभ्यास करणे.
६. राजकीय, आर्थिक व सामाजिक चळवळीतील महिला नेत्याच्या कार्यवर प्रकाश टाकणे.
७. राजकीय, आर्थिक व सामाजिक चळवळीतील महिला कार्यकत्याच्या कार्याच आढावा घेणे.
८. राजकीय, आर्थिक व सामाजिक चळवळीत सहभागी झालेल्या महिलाचा शोध घेणे.

गृहितके

१.समाजातिल जातीभेद अंधश्रध्दा आणि अन्याय दुर करण्यासाठी राजकीय व सामाजिक चळवळ उदयास आली.

२.सामाजिक प्रबोधन करणे हे सामाजिक चळवळीचे उदिष्ट होते.

३. राजकीय, आर्थिक व सामाजिक चळवळीत अनेक महिला नेतृत्व उदयास आले.

४.राजकीय व सामाजिक चळवळीत महिला कार्यकर्त्यातील प्रामुख्याने महत्वाचे योगदान दिले.

५.सामान्य स्त्रीया हयाच राजकीय व सामाजिक चळवळीचा प्रमुख आधार स्तंभ ठरल्या आहेत.

संशोधन पध्दती

नांदेड जिल्हातील राजकीय, आर्थिक व सामाजीक चळवळीत स्त्रियांचा अभ्यास या विषयाचा संशोधनासाठी वर्णनात्मक प्रामुख्याने उपयोग केला आहे. संर्दभ ग्रंथात प्राथमिक व दुययम साधनाचा समावेश होतो. अप्रकाशित आणि प्रकाशित कागदपत्रे, मासीक, जाहिराती, नियतकालिका, वृत्तपत्रे, आत्मचरित्रे, चरित्रे.

प्रकरण योजना

नांदेड जिल्हायातील राजकीय, आर्थिक व सामाजिक चळवळीतील स्त्रीयाचे योगदान एक अभ्यास या विषयाच्या संशोधनासाठी संदर्भ संशोधन पध्दतीचा प्रामुख्याने उपयोग केला आहे. यामध्ये प्राथमिक आणि दुययम संदर्भ ग्रंथाचा समावेश होतो. प्राथमिक साधनात अप्रकाशित कागदपत्रे, प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी अनेक दुययम ग्रंथाचाही आधार घेतला आहे. अशा ग्रथामध्ये नांदेड जिल्हातील राजकीय, आर्थिक व समाजिक चळवळीतील स्त्रीयांचे योगदाना संदर्भात लिहिलेल्या ग्रंथाचा सामावेश केला आहे. मी माझया प्रबंधात मांडणी पुढील प्रकरणात केली आहे.

प्रकरण पहिले

पार्श्वभुमी

प्रकरण दुसरे

नांदेड जिल्हा -भौगोलिक व ऐतिहासिक

प्रकरण तिसरे

राजकीय, आर्थिक व सामाजिक चळवळ महिला नेतृत्व

प्रकरण चौथे

महिला कार्यकत्या

प्रकरण पाचवे

निष्कर्ष

संशोधक

निर्मला दत्तात्रय रत्नपारखे

मार्गदर्शक

डॉ. केंदे किशन चुडामन

लोकमान्य महाविदयालय सोनखेड

ता.लोहा जि. नांदेड.